वाचले :- 1) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग कडील अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र.58/आरोग्य 5, दि.14 मार्च 2020 अन्वये- महाराष्ट्र कोविड 19 उपाययोजना नियम 2020-03-15.

2) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897

3) महाराष्ट्र दारुबंदी कायदा 1949 मधील कलम 142.

4) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005

5) अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर यांचेकडील क्रमांक:-सीएलएफएलआर112020/अधी, दि. 19/03/2020 रोजीचे पत्र.

कार्या-7/गृह/पोल/आरआर/772/2020,
जिल्हादंडाधिकारी कार्यालय, कोल्हापूर
दि. 19/03/2020.

**विषय :- कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव रोखणेकरीता करावयाच्या उपाययोजनाबाबत.**

## -: आदेश :-

ज्याअर्थी, राज्य शासनाने करोना विषाणूचा (कोव्हीड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दि.13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3, व 4 मधील तरतुदींची अंमलबजावणी यादी अधिसूचना निर्गमित केली आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भ क्र. 1 अन्वये प्रसिध्द केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे.

त्याअर्थी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनेचा भाग म्हणून एका ठिकाणी होणारी नागरिकांची गर्दी व त्यामुळे होणारा संसर्ग टाळण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करणे आवश्यक वाटते.

1) कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व मद्य परवानाकक्ष (परमीट रुम) एफएल-3 व एफएल-4 अनुज्ञप्त्या दिनांक 20/03/2020 ते दिनांक 31/03/2020 अखेर बंद ठेवणेचे आदेश देणेत येत आहेत.

2) सर्व सीएल-3 अनुज्ञप्तीमध्ये बसुन मद्य पिण्याची व्यवस्था असल्यामुळे ग्राहकांची होणारी गर्दी विचारात घेता, गर्दी टाळण्यासाठी ग्राहकांना आस्थापनेच्या मंजूर जागेत/परिसरात मद्य पिण्यास दिनांक 20/03/2020 ते दिनांक 31/03/2020 अखेर बंदी घालण्यात येत आहे. आस्थापनांमधील कर्मचाऱ्यास व येणाऱ्या ग्राहकास सॅनिटायझर / साबण व पाण्याने हात स्वच्छ धुण्याची व्यवस्था करण्याबाबत अनुज्ञप्ती धारकांस आदेश देणेत येत आहेत. संबंधीत अनुज्ञप्ती धारकाने सदर आदेशाची तंतोतंत अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. सदर आदेशाचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास अनुज्ञप्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

3) कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व एफएल-2 व सीएलएफएलटिओडी-3 (वाईन शॉप) तसेच एफएलबीआर-2 (बिअर शॉपी) आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या प्रत्येक कर्मच्याऱ्यांस व येणाऱ्या ग्राहकांस सॅनिटायझर / साबण व पाण्याने हात स्वच्छ धुण्याची व्यवस्था करण्याबाबत अनुज्ञप्ती धारकांस आदेश देणेत येत आहेत.

4) कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व एफएल-1 (विदेशी घाऊक विक्री) तसेच सीएल-2 (देशी घाऊक विक्री) अनुज्ञप्ती मधील सर्व कर्मचाऱ्यांना व ग्राहकास सॅनिटायझर / साबण व पाण्याने हात स्वच्छ धुण्याची व्यवस्था करण्याबाबत आदेश देणेत येत आहेत.

2 / . . .

Scanned by CamScanner

उपरोक्त आदेशाचे पालन न करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने अथवा संस्थेने भारतीय दंड संहीता 1860 (45) याच्या कलम 188 अन्वये शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यांत येईल आणि पुढील कार्यवाही करण्यांत येईल. त्याचप्रमाणे अशा व्यक्ती किंवा संस्था महाराष्ट्र दारुबंदी कायदा व आपत्ती व्यवस्थापन कायद्यातील तरतुदीनुसार कारवाईस पात्र असतील. संबंधीत अनुज्ञप्ती धारकाने सदर अ.क्र. 1 ते 4 मधील आदेशाचे तंतोतंत अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. सदर आदेशाचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास अनुज्ञप्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

(दौलत देसाई)
जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर.

प्रति,

सर्व संबंधित अनुज्ञप्तीधारक. (मार्फत:- निरीक्षक/दु.निरीक्षक, राज्य उत्पाउदन शुल्क, कोल्हापूर)

प्रत :-

1) आयुक्त कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर
2) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर
3) पोलीस अधीक्षक, कोल्हापूर
4) अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर
5) सर्व उपविभागीय दंडाधिकारी जि.कोल्हापूर
6) सर्व तालुका दंडाधिकारी जि.कोल्हापूर
7) सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका जि. कोल्हापूर
8) जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर यांनी सदर आदेशास योग्य ती प्रसिध्दी द्यावी.

Scanned by CamScanner